**: बदली वैयक्तिक मान्यता आदेश :**

जा.क्रं.जिपजा/शिक्षण/प्राथ-६/२०२१/1761
कार्यालय जिल्हा परिषद जालना
दिनांक 02 /०८/२०२१.

प्रति,

१. अध्यक्ष / सचिव,
मत्स्योदरी शिक्षण संस्था, सिरसवाडी नाका,
रेल्वे ओव्हर ब्रीजच्या बाजुला, सर्व्हे नं.४८८, जालना ता.जि.जालना

२. मुख्याध्यापक,
मत्स्योदरी ज्ञानमंदिर प्राथमिक शाळा,
अंबड ता.अंबड जि.जालना

विषयः- श्री.लोंढे अशोक रखमाजी, (स.शि.) या अशासकीय प्राथमिक मान्यताप्राप्त शिक्षक कर्मचाऱ्यांना सन २०२१-२२ करीता संस्था अंतर्गत अंशतः अनुदान तत्वावरुन पुर्णतः अनुदान तत्वावर केलेल्या बदलीस मान्यता देणे बाबत.

संदर्भः- १) महाराष्ट्र खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१.
२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन अधिसुचना क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३४१/ टीएनटी-१, असाधारण क्र.१२२, दिनांक ०८ जून, २०२०.
३) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३४१/टीएनटी-१, दिनांक ०१ एप्रिल, २०२१.
४) या कार्यालयाचे वैयक्तिक मान्यता आदेश क्रं.जिपजा/शिक्षण/प्रा-६/२००८/५०७, दि.०२/०२/२००८.
५) या कार्यालयाचे सेवासातत्य आदेश क्रं.जिपजा/शिक्षण/प्रा-६/२०११/१५९५ दिनांक ३०/०३/२०११.
६) या कार्यालयाचे सुधारीत मान्यता आदेश क्रं.जिपजा/शिक्षण/प्राथ-६/२०१६/५१५९, दिनांक २७/१२/२०१६.
७) आपण सादर केलेला प्रस्ताव दिनांक १५.०७.२०२१.

उपरोक्त विषयी कळविण्यांत येते की, आपल्या प्राथमिक शाळेतील श्री.लोंढे अशोक रखमाजी, (स.शि.) यांना संस्था अंतर्गत अंशतः अनुदान (४०%) तत्वावरुन पुर्णतः अनुदान (१००%) तत्वावर केलेल्या बदलीस खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

१. सदरहू कर्मचाऱ्यांना / शाळा व्यवस्थापनाला खाजगी शाळेतील (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ तसेच नियम १९८१ आणि वेळोवेळी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील. आदेशाचे पालन न झाल्यास मान्यता रद्द करणे / काढून घेण्यात येईल.
२. बदली मान्यता प्रकरणी सदर बदली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची प्रथम नेमणूक ज्या अटीवर मान्य केली आहे त्या अटीसह बदली मान्यता प्रदान केली आहे. त्यामुळे शाळा कर्मचाऱ्यांची मान्यता त्यांनी पुर्वी मान्य केलेल्या अटी / शर्ती सह त्या कारणी आवश्यक ती कार्यवाही शाळा प्रमुख / व्यवस्थापनाने करावी.
३. प्रस्तावातील वैयक्तिक मान्यता संस्था, शाळा समिती व मुख्याध्यापकाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या / माहितीच्या आधारे देण्यात येत आहे. प्रस्तावातील कागदपत्रात काही विसंगती किंवा चुकीची माहिति सादर केली आहे असे निदर्शनास आल्यास दिलेली मान्यता रद्द केली जाईल.
४. चुकीची माहिती / कागदपत्रांच्या आधारे दिलेली मान्यता रद्द केल्यास व दरम्यानच्या काळात कर्मचाऱ्यास जादा वेतन अदा केलेले असल्यास त्या अदा झालेल्या वेतनाच्या वसूलीची संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकाची राहील.
५. चुकीच्या कागदपत्रांच्या / खोटया माहितीच्या आधारे दिलेली मान्यता रद्द केल्यास अदा झालेले वेतन मुख्याध्यापकाने संबंधितांकडून वसूल न केल्यास अदा झालेली रक्कम मुख्याध्यापकाच्या वेतनातून वसूल करण्यांत येईल.
६. या शिवाय शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेले व यापुढे प्राप्त होणारे आदेश सदरहू कर्मचाऱ्यांवर / शाळा प्रमुख / व्यवस्थापनावर बंधनकारक राहतील, याची नोंद घ्यावी.
७. शाळेस सन २०१३-१४ ते २०१८-१९ च्या संच मान्यतेनुसार मंजूर असलेल्या मंजूर व रिक्त पदांवरील नियुक्ती असणे आवश्यक आहे.
८. सोबत दिलेल्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या आपल्या शाळेतील शिक्षक संवर्ग कर्मचाऱ्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविल्या प्रमाणे संस्था / शाळेने केलेल्या शिफारशीनूसार अंशतः अनुदान तत्वावरुन (४०%) पुर्णतः अनुदान तत्वावर केलेल्या बदलीस मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.